# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 26/04/2021 (सोमवार)
(सायंकाळ)

---

अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. बोरी :— अंतर्गत 10 कि. मी. मौजा बोरखेडी मेरात हरियाना ढाबा येथे दिनांक 24/04/2021 चे 23.30 वा. ते दिनांक 25/04/2021 चे 03.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— हरियाना मोहसिन अली मोहम्मद खान वय 22 वर्षे रा. फिरोजपूर नमक 156 मेवात हे मृतक नामे— शाहिद बसिर खान वय 32 वर्षे रा फरिदाबाद सेक्टर नं 2 हरियाना यांचे सह आरजे— 18/जीबी— 8139 क्रमांकाच्या ट्रकने दिल्ली वरून मदूराई तामिलनाडू येथे जात असता मृतकचे अचानक छातीत दुखून प्रकृती खराब झाल्याने मेवात ढाब्यावर आणले असता तो मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि उघडे 8421278139 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत 0.5 कि. मी. अंतरावर कन्हान नदीच्या खाली येथे फिर्यादी वडील यांचा मुलगा/मृतक नामे— हेमराज रामकृष्ण वकलकर वय 33 वर्ष, रा. स्वामी विवेकानंद नगर, कन्हान हा दि 23/04/2021 रोजी दुपारी 14.30 वा. घरी कुणालाही न सांगता घरून निघुन गेला. त्याचा नातेवाइकांकडे शोध घेतला असता कोठेही तो मिळुन न आल्याने पोस्टे कन्हान येथे मिसींग दाखल आहे. दि 25/04/2021 चे दुपारी अंदाजे 13.45 वा. दरम्यान पोस्टे कन्हान येथुन फोन आला की, "कन्हान नदीच्या पुलाखाली एक इसम ची डेडबॉडी सापडली आहे" तेव्हा फिर्यादीने कन्हान नदीच्या पुलाखाली जाउन पाहीले असता ती डेडबॉडी त्यांचा मोठा मुलगा हेमराज याची होती. मागील 1 वर्षापासुन नौकरी न मिळाल्याने तो नौकरीच्या त्रासामुळे कंटाळुन त्याने नदीच्या पुलाखाली उडीमारून तो स्वताचे मरणास कारणीभुत ठरला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रामकृष्ण श्रावणजी वकलकर वय 62 वर्ष, रा. स्वामी विवेकानंद नगर कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा अरूण सहारे 9309592512 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर